वर्ष : ५ | अंक : १७ | जूलै-सप्टें. २०२२ | स्थळ : पुणे | पृष्ठे : ४८+४ | किंमत : रु.५०/- | ISSN 2582-1865

# वसंतवर्षा



Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# आत्मचरित्रातील आई

प्रा. डॉ. रंजना नेमाडे – ९७६४२९६००३

**प्रबोधनाच्या प्रभावाने आलेले गुण**

एकोणिसाव्या शतकामध्ये प्रबोधनाची चळवळ झाली. त्यात स्त्रियांना शिक्षण देण्याची कल्पना पुढे आली. त्याचेही पडसाद आईचे वर्णन करताना दिसतात. मो. वा. जोशी यांच्या आईला मिशन हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. तेव्हा तेथील बाया येशूची थोरवी सांगत. पण जोशी यांच्या आईचा धार्मिक व्यासंग काही कमी नव्हता. तिने इतरही पुष्कळ वाचले होते व ऐकले होते. ती चतुर आणि संभाषणात कुशल होती. तसेच ती विशेष बुद्धिमान व धीट होती. असे जोशी म्हणतात. तिने त्यांना घरी सुबक गणपती, मातीचे शिपाई बनवून दिले होते. रात्री आई पारमार्थिक वाचन करी. हरिदासांच्या सांगण्यावरून रोज एकनाथी भागवतही वाचत असे असा उल्लेख करतात. श्रीपाद जोशी यांच्या आईला लिहिता येत नव्हते. पण छापलेला मजकूर वाचता येत असे. तिच्याजवळ आनंद रामायण नावाचे पुस्तक होतं. त्याची ती पारायण करत असल्याचे ते नोंदवतात, नाना अभ्यंकर त्यांच्या आईच्या हिशेब करण्याच्या पटाईतपणाचा उल्लेख करतात. वडील भाऊ आणि आईने सांगितलेला हिशेब यांच्या उत्तरात फरक पडला तर आईचेच उत्तर बरोबर असायचे. असे अभ्यंकर नोंदवतात. रेगे यांच्या आईला भाजीपाल्याची लागवड करणे, त्याची वाढ करणे, त्याला खतपाणी घालणे हा छंद होता. मोडक अ. वा. यांच्या आईलाही चांगले लिहिता वाचता येत असे. त्यांचे पाठांतर खूप होते. व्यंकटेश स्तोत्र, शिवलीलामृत, ध्रुव, परिक्षित राजाचे गाणे, श्लोक, आर्या, अभंग इत्यादी त्यांना तोंडपाठ येत असे.

म.मा. केळकर यांची आई प्रसिद्ध लेखिका गिरिजाबाई केळकर या आहेत. त्यांच्या आईला शिवण टिपण, विणणे भरणे, यांची आवड होती. सार्वजनिक जीवनात नावलौकिक मिळाल्यामुळे तिला अनेक थोरामोठ्यांच्या घरची आमंत्रणे येत. तसेच तिचे लेखन, वक्तृत्व याविषयी जळगावच्या नागरिकांनी तिचा सत्कार केला होता. तेव्हा तिला मानपत्र अर्पण केले होते तिचे वक्तृत्व, कथालेखन, नाट्यलेखन या सर्वांचा सापेक्षतेने त्यात उल्लेख केला होता. वयाच्या १७ –१८ व्या वर्षी **कुसुम** या टोपण नावाने त्यांची कथा प्रसिद्धीस आली होती. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या आग्रहामुळे अकोल्याच्या साहित्य संमेलनात त्यांच्या आईने पहिले भाषण केले. उत्तम व्याख्याती म्हणून विशीच्या सुमारास नाव मिळवले होते. खाडिलकरांच्या **बायकांचे बंड** या नाटकाला उत्तर म्हणून तिने **पुरुषांचे बंड** नाटक लिहिले. ते रंगभूमीवरही आले. त्याचवेळी तिला पहिली स्त्री नाटककार म्हणून धुळ्याच्या नागरिकांनी एक पदकही दिले होते. असे आईचे चतुरस्त्र गुण केळकर यांनी नोंदवले आहेत. भावे यांची आई त्यांच्या लहानपणीच वारली होती. २–४ मराठी वर्ग शिकलेली आई गाणीही करत असे. तिच्यात कवित्वाची मूळ ठिणगी होती. आपल्याला वाचनाचा, श्रवणाचा, मननाचा, पठणाचा, संस्काराचा वारसा आईकडूनच मिळाल्याचे भावे नोंदवतात. प्र. के. अत्रे हे 'आपल्या आईचा गळा अतिशय गोड असल्याचे सांगतात.' दत्ता भट (**झाले मृगजळ आता जलमय**) यांची आई तल्लख, स्मरणशक्ती असलेली, गोष्टीवेल्हाळ, नकलाकार होती. चिटणीस यांची आई कीर्तनकार होती. मात्र तिचा कल जहाल राजकारणाकडे होता. संगीत तसेच गद्य नाटकेही तिला आवडत असत. शंकराचार्यांच्या मायावादावर तिचा अढळ विश्वास असला तरी तिने संसाराकडे दुर्लक्ष केले नाही, असे ते म्हणतात. केळकर यांच्या आईने लिहिलेल्या कथा व नाटक, उत्तम व्याख्याते म्हणून मिळवलेला नावलौकिक याची ते नोंद घेतात. मामलेदार व हुजूर डेप्युटी कलेक्टरची बायको, शिवाय स्वतःचे कर्तृत्व यामुळे गिरजाबाई केळकरांना असा नावलौकिक मिळू शकला. इतर स्त्रियांमध्ये कोणी कवयित्री, गायिका, नकलाकार, किर्तनकार होत्या. तरी त्यांना पुरेसा अवसर व प्रोत्साहन मिळाले नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

**परिवर्तनशील माता**

संसार, चुलमूल सांभाळून आपल्या अंगच्या गुणांचा मर्यादित रूपात अविष्कार करणाऱ्या आईचे चित्र आत्मचरित्रकारांनी रेखाटले आहे. तसेच हे सर्व सांभाळून समाजसेवेत रस घेणाऱ्या, अनुभवाने मनपरिवर्तन झालेल्या आईचे चित्रही रेखाटले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. शं.वा. किर्लोस्कर (**शंवाकीय**) यांची आई आपल्या संसारात गढून न जाता गोरगरीब व अनाथ स्त्रियांना शक्य ते सहाय्य देण्यात झटत असे. स्त्री शिक्षणाची ती कैवारी होती. म्हणून तिने सोलापूरचे स्त्रियांना शिक्षण देणारे सरस्वती मंदिर चालवण्याचे काम पत्करले होते. एखादे अनाथ मूल सापडले म्हणजे त्याला घरी आणून न्हाऊमाखू घालून ती जेवायला वाढी. त्याची पुढची सोय लावी. बालविधवांची हिंगण्याला सोय लावून देई. एखाद्या गरीब बाईला गरज लागली म्हणजे तिच्या घरी जाऊन तिचे बाळंतपणही करी. पुरूषांच्या सभेत भाषण करणारी सोलापुरातली तीच पहिली स्त्री होती. त्यांच्या आईच्या दृष्टीस एखादा विशेष गुण असलेली स्त्री पडली तर, ती कोणत्याही जातीची असली तरी तिचा गौरव करण्याची संधी वाया जाऊ देत नसे. असे किर्लोस्कर नोंदवतात.

तर केशवराव भोळे यांची आई तडफदार व बाणेदार होती. शेजारच्या यमुताई दुपारी त्यांच्या आईला मासिक मनोरंजन, आगरकरांचे लेख, हरिभाऊंच्या कादंबऱ्या वाचून दाखवत असे. स्त्रियांची परवशता दूर झाली पाहिजे. बालविवाह बंद झाले पाहिजेत. यासारख्या गोष्टी आईला पटल्या होत्या. विधवा विवाहाबद्दल तिचे मत अनुकूल झाले होते. आपल्या नातीचा पुनर्विवाह करण्यासाठी तिने आपल्या मुलीचे मन वळवण्याचा प्रयत्न केला होता. ती न्यायप्रिय, सत्यप्रिय, प्रयत्नवादी होती. परमेश्वरावर तिची श्रद्धा असली तरी पूजेचं तिने अवडंबर माजवले नाही. असे वेगळे लक्षणीय रूप भोळे, किर्लोस्कर रेखाटतात.

**आईबद्दलची नाराजी**

काही आत्मचरित्रकारांनी आईचे दोषही नोंदवले आहेत. सुरुवातीला नकळत्या वयात जरी आईविषयी नाराजी असली तरी नंतर समजत्या वयात त्यांचे तिच्याबद्दलचे मत बदललेले दिसते. आईच्या त्यावेळच्या वर्तनाची ते चिकित्सा करतात. विश्राम बेडेकर (**एक झाड दोन पक्षी**) यांना आपल्या आईने कुरवाळलेले, जवळ घेतलेले, तिच्याशी सुखदुःखाच्या गोष्टी बोललेले आठवत नाही. त्यांना तिचा असंतोष, स्वतःशी चाललेली चरफड आठवते. पण आईला आपल्या बुद्धीचा अभिमान होता. पुढे आई-वडिलांच्या भांडणात वडिलांच्या बाजूने बेडेकर बोलल्यावर आईने त्यांच्या अंगावर चुलीतली पळी फेकणे या मागचा अर्थ लक्षात येतो. त्याची त्यांना खंत वाटते. त्यांना जाणवते की आई भांडत असे ती त्यांच्याशी नव्हे, तर स्वतःशी. मारत असे ती त्यांना नव्हे तर स्वतःला. तिचे घोडागाडीचे स्वप्न स्वतःसाठी नव्हते. मुलासाठी वैभवाचे स्वप्न मनात धरून ती वाट पाहत बसली होती. आपल्या आईचे आपल्यावर खूप प्रेम असले पाहिजे. जाणतेपणी त्यांना आईचे प्रेम समजले. म. मा. केळकर यांची आई गिरजाबाई यांच्या वेगळ्या गुणांची त्यांना जाणीव आहे. पण आता वृद्धपणी काळाबरोबर ती येऊ शकली नाही याची उणीव त्यांना जाणवते. येत नाही ते टाळायचे आणि येईल तेवढ्यावर भागवायचे अशी सवय लागली त्याची फुशारकी वाटू लागली. आईने आमच्या दृष्टीने कधी विचार केला असता तर बरे झाले असते, असे अजूनही त्यांना वाटते. ते नाराजी व्यक्त करतात. पण येथे त्यांना आईच्या मायेची जाणीव आहे. वडिलांना घरातील गोष्टींसाठी वेळ नसे. त्यामुळे घरातील निर्णय बहुदा आईच घेई. इतक्या आघाड्यांवर लढत असूनही तिने आपल्याकडे आणखी लक्ष द्यायला हवे, अशी तिच्याबद्दल सुपरवुमनची अपेक्षा ते ठेवतात. घारपुरे यांची आई काहीशी भोळी, अर्धवट असल्याचे माहीत असूनही मुलांना योग्य शिक्षण द्यावे, घरात सगळे ठेवावे, संसार टुकीने करावा हा उरक तिच्यात नव्हता. तिला स्वयंपाकाचा उरक ही बेताचाच होता. असे

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

घारपुरे नोंदवतात.

आत्मचरित्रकार आपल्या आईच्या गुणांचा तसेच उणिवांचाही उल्लेख करतात. एखादा गुण आईमध्ये नसेल तर त्यामागील कारणपरंपरा लक्षात न घेता, किमान चिकित्सा न करता त्याच्यावर टीका केली जाते. खांडेकर आपल्या सख्ख्या आईविषयी संपूर्ण आत्मचरित्रात नाराजीचा सूर काढताना दिसतात. आपला बेजबाबदारपणा वाढण्यासाठी ते आईला जबाबदार ठरतात. घरात पुरुष माणूस नाही तर मुलांना वळण लावले पाहिजे, हे सुचण्याइतकी मनाची परिपक्वता संकटांनीही तिच्या ठिकाणी निर्माण झाली नाही. कोंड्याचा मांडा करण्याची कला आईच्या ठिकाणी अभावाने होती. त्यांच्या मनावर स्त्रीच्या कर्तबगारीविषयी काही कल्पनांचा पगडा आहे. 'त्या काळी स्त्रियांची कर्तबगारी मोजली जायची ती ५० माणसांचा झटपट सुरेख स्वयंपाक करते. तिची पंधरा बाळंतपणं झाली पण अजून ती कशी पंचविशी तिशीतल्या बाई सारखी दिसते किंवा तिच्या अंगावर दोन शेर सोन्याचे दागिने असल्या गोष्टींवरून.'[4] खांडेकर आपल्या आईमध्ये संस्कृतीने, समाजाने लादलेले स्त्रीत्व शोधतात. आई कशीही असली तरी तिला त्रास होऊ नये असे त्यांना वाटते. आईविषयी नाराजीची खांडेकरांची भावना पुण्याला शिक्षणासाठी आल्यावर बदललेली दिसते. तिचे हाल होऊ नयेत तिच्या वाट्याला लाचारी येऊ नये असे त्यांना वाटते. कारण 'क्वचिदपी कुमाता न भवति' ही भावना आहे.

श्रीपाद जोशी मात्र आपल्या आईच्या स्वभावातील केवळ दोष न दाखवता त्यामागील कारणांची चिकित्सा ही करतात. तिचा सुस्वरूप नाजूकपणा, घाण्याच्या बैलसारखे कष्ट करणे, वाचन करता येणे या गुणांचा उल्लेख करून मोठेपणा देतात. पण एक माणूस म्हणून तिच्यात दोषही असणार हे मान्य करतात. त्यामुळे तिच्या वागण्यातील खोटेपणा – तूप फक्त साठवून ठेवणे, कुणाचे बरे झालेले न पाहवणे, लोकात कलागती लावून देणे – या दोषांचा उल्लेख करतात. मला वाटते की माणुसकीच्या कसोटीवर स्वतःचं व इतरांचे मूल्यमापन करण्यात आलं पाहिजे. असं मी मानतो'[5] असे ते म्हणतात. स्त्रीवादी विचारसरणीमध्ये स्त्रीच्या मनातील परात्मभाव (**एलियनेशन**) हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. या परात्मभावाची जाणीव श्रीपाद जोशी यांना आहे. त्यामुळे ते पुढीलप्रमाणे विचार करू शकतात.' 'आईचा सर्वात मोठा दोष असा की, ती सासरच्या जीवनाशी कधीच समरस होऊ शकली नाही. तिचा माहेरचा ओढा कमी झालाच नाही. सासरपेक्षा आपलं माहेर अधिक श्रेष्ठ. अशीच भावना तिच्या मनात घर करून बसली होती. त्यामुळे आम्हा मुलांचं किंवा आमच्या मुलांचं कौतुक असं तिला कधी वाटलंच नाही. पितृप्रधान किंवा पितृसत्ताक समाजव्यवस्थेत सासरसंबंधीचा हा परात्मभाव स्त्रीच्या दुःखाला नेहमीच कारणीभूत होत असतो.'[6]

कृ.पां. कुलकर्णी आईच्या स्वभावातील, वर्तनातील फरक नोंदवतात. बाहेर हसतमुख असणारी आई घरात मात्र कठोर बोलणारी काही वेळा भांडणारी देखील आहे. तिच्या वर्तनात हा फरक पडण्याची चिकित्सा ते करतात. सासरी तिचा सासू आणि नणदेकडून छळ होई. त्यातच त्यांचे वडीलही आई बहिणीचे ऐकत. त्यामुळे आयुष्यभर तिला दुःखात दिवस काढावे लागले. त्यामुळे तिच्या घरच्या आणि बाहेरच्या वर्तनात फरक पडत असे, याची जाणीव त्यांना आहे.

ना.म. पटवर्धन यांना आपल्या आईतील दोष म्हणजे ती सुग्रण नसणे. रोजचा साधा स्वयंपाक व विशेषतः थालीपीठ, सांडगे, फोडणीच्या मिरच्या, गोळ्याचे सांभारे, धिरडी, आंबोळ्या असले खमंग व चविष्ट पदार्थ ती चांगले करी.... मुलांना प्रत्यक्ष शिकवण्याच्या फंदात तर ती कधीच पडली नाही.'[7] आईची व्यक्ती म्हणून असलेली मर्यादा मान्य करण्याची परिवर्तनशीलता पटवर्धनांच्या वक्तव्या मधून दिसून येते.

**आईवरील अन्याय**

लहान असूनही आईवर घरातल्या व्यक्तींकडून अन्याय होतो. याची जाणीव काही आत्मचरित्रकारांना दिसते.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

हे अन्याय विविध प्रकारचे आहेत. काही वेळा ती सासुरवाशीण असल्याने तिला निमूटपणे सर्व कामे करावी लागतात. स्वतःचे मतही मांडता येत नाही. घरातील व्यक्तींकडून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो. आई आणि वडील यांच्यात रूप, स्वभाव, वय यांच्यात तफावत असल्यामुळे आईची घुसमट होते. अशा विविध अन्यायाची ते दखल घेतात. के.ना. वाटवे (**माझी वाटचाल**) यांच्या आईचा आत्याकडून जन्मभर छळ झाला याची जाणीव आहे. आठ नऊ मुलांची आई झाली तरी ती सासुरवाशीन असल्याने तिला मतच नसे. ते नोंदवतात. गजानन वाटवे यांच्या वडिलांचा स्वभाव संतापी होता. त्यांच्या निर्णयापुढे आईला काही मत नसे. मांडलेले घर नवऱ्याच्या लहरींमुळे स्वतःच्या हाताने मोडून सतत दुसऱ्या गावी जावे लागले तरी तिला वडलांना आपल्या मनातील कढ बोलून दाखवता येत नव्हते. याची त्यांना कल्पना आहे. यशवंत पाठक (**अंगणातले आभाळ**) यांना ही आपली आई सासुरवाशीण होती. तिला ठराविक स्वातंत्र्य होते याची जाणीव आहे. यशवंत पाठक यांच्या आईला आजी असेपर्यंत कुलधर्म कुलाचारासाठी कर्जाऊ सामान आणावे लागे. ते तिला आवडत नव्हते. पण आजीपुढे आणि वडिलांपुढे तिचे चालत नसे. तिचा कोंडमारा होई. सर्वांना वाढून शिल्लक राहिले तर तिला जेवायला मिळे. नाहीतर ती सातूचे पीठ कालवून खायची. वडिलांना मेहनतीच्या मानाने कमी बिदागी मिळाल्यावर वडील चिडून मुलांवर राग काढत. अशा वेळेला आई काही बोलत नसे. पण एखादा शब्द बोलली तर, तिला ही प्रसाद मिळे. मुले मोठी झाल्यावर कृतीचा नाहीतरी शाब्दिक प्रसाद मिळायचा. असे ते नोंदवतात. अगदी सासुरवास नसला तरी वडिलांपुढे आईला मत मांडणे शक्य नसे. हे सेतुमाधवराव पगडी (**जीवनसेतू**) सूचकपणे सांगतात. त्यांना शिकवण्यासाठी येणारे गृहस्थ त्यांना बेदम मारहाण करत. त्या दुःखाने आई कळवायची. तिला ते सहन होत नसे. पण तिला गप्प बसणे भाग होते. असे ते म्हणतात. कृ. पां. कुलकर्णी (**कृष्णाकाठची माती**) यांच्या वडिलांनी आईच्या अखेरच्या आजारात आई माहेरी असताना तिच्या माहेरी गेले. परंतु तिच्याशी न बोलता बाहेरच्या बाहेर निघून गेले. त्यामुळे तिला मानसिक त्रास झाला याची नोंद केली आहे. लग्नातील मानपानावरून गावातल्या गावात माहेर असूनही आपल्या आईचे काही दिवस माहेर बंद झाल्याची कल्पना श्री.के. क्षीरसागर यांना आहे. सुखापेक्षा दुःख तिच्या वाट्याला अधिक येई, असे ते म्हणतात. कृ.पां. कुलकर्णी, भागवत, श्री. के. क्षीरसागर यांना आईची कुचंबणा होत असलेला मानसिक त्रास लक्षात येतो. क्षीरसागर यांच्या वडिलांनी आईला नंतर सुख दिले तरी ते त्यांच्या लहरीवर अवलंबून होते याची जाणीव आहे. आईच्या माहेरचा राग व्यक्त करण्याचे साधन म्हणून वडलांनी तिच्याकडे पाहिल्याचे त्यांना जाणवते. प्र.के. अत्रे यांचे वडील आजारपणामुळे चिडचिडे झाले होते. तेव्हा तिच्याशी ते खेकसल्या वाचून बोलत नसत. एक-दोनदा त्यांच्या हातचा प्रसाद ही तिला मिळाला. आजीच्या आणि वडिलांच्या धाकाने दराऱ्याने सर्व माणसांसमोर आई भित्री, अबोल बनली होती. ती गोगलगाई सारखी गरीब असून तिच्या तोंडून अक्षरही निघत नसे, असे म्हणतात. अत्रे यांचे वडीलही आपला राग व्यक्त करण्याचे साधन म्हणून आपल्या पत्नीकडे पाहतात.

**सावत्र / दत्तक आईवरील अन्याय**

सख्ख्या आई वरील अन्यायाची दखल आत्मचरित्रकारांनी घेतली त्याचप्रमाणे सावत्र आईवरील अन्यायाची दखलही त्यांनी घेतली आहे. पु. भा. भावे (**प्रथमपुरुषी एकवचनी**) यांच्या सावत्र आईला सर्व भौतिक सुखे- नोकरचाकर, उत्तम खाणेपिणे असले तरी स्वातंत्र्य मुळीच नव्हते. तिची मानसिक कोंडी होत असे. त्यांच्या कादंबरी वाचनावरही त्यांनी बंधन घातले होते. भावे यांनी आपल्या आईवरील अन्यायाची चिकित्साही केली आहे. स्वतंत्र आणि बरीचशी सुधारकी मत असणाऱ्या आपल्या सावत्र आईला घराबाहेर पडता आले नाही. त्या चार भिंतीआड डांबलेल्या होत्या. त्याचे वर्णन ते पुढील प्रमाणे करतात. 'मुले, नवरा व संसार सांभाळणे' हे काम तसे फार महत्त्वाचे आहे. पण 'स्त्रीला इच्छा

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

व वेळ असल्यास दोन घटका घराबाहेर पडण्यासाठी घराची दारे उघडी असणे व ती तशी नसणे यात फार मोठे अंतर आहे. अहोंची दारे बंद होती. वडिलांनी ती वर्षातून चार दोनदा उघडली तरच अहो घराबाहेर पडणार. एरवी त्या घरातच जखडबंद असत.'8 अशा तीव्र शब्दात ते वडिलांच्या वर्तणुकीबद्दलचा निषेध नोंदवितात. आपल्या सावत्र आईच्या मर्यादा लक्षात घेऊनही भावे त्यांचे माणूसपण विसरत नाहीत. आमच्या अहोना त्या वयातही मते होती. ठाम मते असल्याचे त्यांचे वय होते. यावरून आपल्या सावत्र आईला एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून काही आवड, वेगळे मत असू शकते याची ते नोंद घेतात.

वि. स. खांडेकर आपल्या दत्तक आईवर झालेल्या अन्यायाची दखल घेतात. उतारवय झालेल्या या दत्तक आईला विहिरीवरून पाणी आणणे, ताक घुसळणे, स्वयंपाक करणे, कोणत्या ना कोणत्या कारणाने गायीची धार काढणे ही सर्व कामे तिला करावी लागत. आर्थिक स्थिती चांगली असूनही दत्तक वडिलांच्या मर्जीखातर तिलाही कामे करावी लागत. तिची सारी बाळंतपण नानेली सारख्या खेड्यात झाली. खेडवळ सुइणी शिवाय इतर कोणी मदतीला नसे. ही बाळंतपणेही अवघड असत. पण तिचे दिवस भरत आले की त्यांचे वडील कोर्टकचेरीची कामे काढत. बाळंतपणाच्या वेळी हजर राहात नसत. त्यांच्या दत्तक आईचे लग्न तिच्या सातव्या–आठव्या वर्षी झाले होते. लग्नानंतर घरकामातल्या किरकोळ चुकीसाठी तिच्या कमरेला दोर बांधून तिच्या नणंदेने परसातल्या विहिरीत सोडण्याची शिक्षा तिला दिली होती. अशा सासुरवासाने ती अबोल राहिली असावी, असे त्यांच्या मनात येते.

आत्मचरित्रकार आपल्या सख्ख्या आईवरील कुटुंबांतर्गत अन्यायाची दखल घेतात त्याचबरोबर सावत्र आणि दत्तक आई–वडील अन्यायाची दखलही घेतात. मात्र ते स्वतः लहान असल्याने परावलंबी असल्याने त्याविरुद्ध काही उपाययोजना करू शकत नाहीत. आत्मचरित्राचे लेखन करतानाही त्यांना हे अन्याय पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे होत आहेत, याची जाणीव दिसत नाही.

इतकेच नाही तर शक्य असूनही अन्याय दूर करण्याच्या संदर्भात काही वेळा प्रत्यक्ष कृतीही करत नाहीत. पती निधनानंतर पत्नीचे केशवपन करण्याच्या रुढीचे उच्चाटन करण्यासाठी एकोणिसाव्या शतकातच प्रयत्न केले होते. त्याचा परिणाम झालेला दिसत नाही. चिंतामण कोल्हटकर, प्र.के. अत्रे यांनी आईच्या केशवपनाचा प्रसंग अशाच रीतीने भावनाशीलतेने वर्णन केला आहे. अत्रे यांनी नेहमीच समाजातील इतर दोषांवर नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे. पण आपल्या आईला विद्रूपतेतून बाहेर काढणे शक्य आहे हे ते लक्षातही घेत नाहीत. याउलट आपल्या वडिलांच्या मृत्यूसमयी आईचे वय सुमारे साठ वर्षे असताना आनंद साधले आईशी बोलताना सांगतात की, तिला पुन्हा लग्न करावयाचे असल्यास आपली हरकत असणार नाही. यात शरीराची हौस नसून आवडत्या माणसाची सोबत सतत असावी, अशी आपली भूमिका ते स्पष्ट करतात.

### आईची अभ्यासनीय रूपे

आत्मचरित्रकारांनी आपल्या आइच्या सात्विकता, प्रेमळपणा, धार्मिकता, मृदुभाषीत्व,पती व मुलांची सेवा करणे, त्यांच्या आज्ञेत राहणे अशा गुणांचा गौरवाने उल्लेख केलेला आहे.यातूनच पुढील आईही अशाच आदर्श रूपात असण्याची अपेक्षा व्यक्त होते. यातूनच अशा गुणांचे उदात्तीकरण केले जाते. पत्नीने पतीच्या आज्ञेतच राहावे हा आदर्श गुण मानला जातो. याचे उदात्तीकरण व. शां. देसाई (**अशीच एकाची गोष्ट**) यांच्या आत्मचरित्रात दिसते. त्यांच्या आईला दमा होता. वडिलांच्या मृत्यूनंतर तिच्या प्रकृतीला झेपत नसतानाही स्वयंपाकाचा भार तीच उचलत असे. तिच्या या काटकसरीबद्दल देसाई यांनी तिला नंतर विचारले. त्यावर आपल्या मागे व्याजाच्या उत्पन्नातूनच सर्व घर खर्च करावा लागेल. असे देसाई यांच्या वडिलांनी सांगितले होते. असे उत्तर आईकडून मिळाल्यावर ते म्हणतात, 'आईच्या तपश्चर्येची खरी कल्पना मला हे शब्द ऐकल्यानंतर आली. पतीची सेवा करणे आणि

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

पतीची आज्ञा पतीनिधनानंतरही पाळणे हा एकच धर्म तिला माहित होता.'[9] कोणत्याही परिस्थितीत पतीचे ऐकणे हाच धर्म समजण्याची वृत्ती दिसते. त्यांच्या आईलाही उत्पन्नाचे अन्य मार्ग शोधणे सुचत नाही. किंबहुना पितृप्रधान समाजाने हा पर्याय स्त्रियांना खुला ठेवला नव्हता. मधुकर तोरडमल यांच्या वडिलांनी तीन लग्न केली. त्यांची तिसरी पत्नी ही तोरडमल यांची आई. त्यांच्या पहिल्या आईला दोन मुली झाल्या. पहिल्या बाळंतपणात आलेल्या मेहुणीशी त्यांनी प्रेमप्रकरण केल्यावर आईने जाब विचारला. तेव्हा तिच्या त्या धाकट्या बहिणीशी आपल्याला लग्न करायचे असून त्यासाठी तिने तिच्या वडिलांना मुलगी देण्यास राजी करावे. असा त्यांनी आग्रह धरला. आईने ते निमूटपणे मान्य केले. मात्र पहिल्या बाळंतपणातच मुलासहित तिचा मृत्यू झाला. थोरल्या आईला दुसरीही मुलगीच झाली. या मुलींशी खेळायला येणाऱ्या शेजारच्या मुलीशी वडिलांनी सूत जमवले. यावेळीही तिच्या वडिलांकडे मागणी घालण्याकरता आईला जावे लागले. हे लग्न जमले नाही. नंतर वडिलांचे तिसरे लग्न झाले. हीच तोरडमल यांची आई. तिचे नाव पुतळाबाई. थोरल्या आईने तिला सर्व मार्गदर्शन केले. तिच्या कामाचा उरक आणि आवाका लक्षात येताच थोरल्या आईने आपणहून किल्ल्यांचा जुडगा तिच्या हवाली केला. यावर तोरडमल म्हणतात, 'सत्तांतर अगदी आपखुशीने झाले. सवतीमत्सर वगैरे कुठलाही प्रकार झाला नाही. याला दोघींचा समजूतदारपणा हेच प्रमुख कारण असले, तरी वडिलांनी समतोल बिघडू दिला नाही. याचे श्रेय वडिलांना देणारे उद्गार दोघींच्याही तोंडून मी ऐकलेले आहे.[10] पतीची सर्व कृत्ये समजूतदारपणे म्हणजे निमूटपणे पत्नीने सहन करावी हेच येथे सुचवले जाते. थोरल्या आईच्या मृत्यूनंतर तिला चितेवर ठेवताना तिच्या हातातील बांगड्या न काढता तिला तसेच ठेवले गेले. तेव्हा चिता विझल्यावर त्या बांगड्या काढाव्यात असा विचार सर्वांनी केला. पण त्यापूर्वीच त्या बाहेर घरंगळून आल्या. हा प्रसंग सांगून तोरडमल म्हणतात की, 'माझी थोरली आई अत्यंत निस्वार्थी. आयुष्यभर फक्त वडिलांपासून तर आमच्या सगळ्यासाठी जगण्यातच तिचे आयुष्य संपले. कोणालाही कसलाही त्रास तिने कधी दिलाच नाही. या क्षणी माझ्या मनात आले आई जगली तशी मेली. अगदी निस्वार्थीपणे. कोणाला आपला त्रास होऊ नये याची तिने शेवटी सुद्धा काळजी घेतली. जळून थंड होईपर्यंत कशाला कोणाला थांबायचे म्हणून तिने वेळीच आपण होऊन बांगड्या परत केल्या.'[11] यातून ते आपल्या थोरल्या आईच्या निस्वार्थीपणाचे, कोणाला त्रास न देण्याच्या वृत्तीचे उदात्तीकरण करतात. त्यांच्या आईने सांगितलेल्या पुढील प्रसंग अशाच स्वरूपाचा आहे. त्यांच्यावेळी त्यांच्या आईला दिवस गेले असताना तिचे बाळंतपण दवाखान्यात करायचे ठरवले. तेव्हा मात्र थोरल्या आईने सांगितले, बाळंतपण घरीच माझ्या हाताने होईल जे काही होईल त्याला मी जबाबदार आहे. असे खवळून म्हटल्यावर वडिलांनी ते चुपचापपणे मान्य केले. यथावकाश तोरडमल यांचा जन्म झाल्यानंतर त्यांच्या थोरल्या आईने वडिलांना सांगितले की, आजपासून हा मुलगा माझा. तुम्ही तुमची बायको सांभाळा. मी याला सांभाळीन. येथे तोरडमल सवतीच्या सर्व खस्ता खाणे, लोकापवाद सहन करणे, तिच्या मुलाला सांभाळण्याची जबाबदारी घेणे, ती पार पाडणे या कृतींचे उदात्तीकरण करतात. थोरली आई आणि आपली आई यांच्या संबंधाविषयी थोरल्या आईच्या मृत्यूनंतर सांगताना ते म्हणतात, 'थोरली आई तिची सवत नव्हतीच. थोरली बहीण होती. फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड होती. तिने सर्व काहूर मनातल्या मनात दाबून आम्हा सर्वांना धीर दिला आणि घरातल्या कर्त्या पुरुषाच्या तत्परतेने थोरल्या आईची यथासांग बोळवण केली.'[12] यातून सवतीनी कसे राहावे याचा जणू आदर्शच घालून दिल्यासारखे होते.

**अपत्य प्रेमाचे उदात्तीकरण**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने ज्यांना राष्ट्रीय व राज्य पुरस्कार मिळाला आहे अशा आदर्श शिक्षकांनी आत्मचरित्र लिहावे यासाठी प्रोत्साहन दिले. यासाठी आत्मचरित्रलेखन शिबिर आयोजित केले होते.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

नव्या पिढीचे शिक्षक आणि पालक यांना त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य मार्गदर्शक ठरावे हा हेतू त्यामागे होता. रेगे यांचे '**माझे जीवन माझे बाळ**' हे यातील पहिले आत्मचरित्र आहे.

यामध्ये रेगे यांनी आपल्या आईचे व्यक्तिचित्र प्रभावीपणे रेखाटले आहे. त्यामध्ये आईचे गुण, तिचा छंद त्यांना वळण लावण्यासाठी केलेले प्रयत्न यांचा समावेश आहे. तसेच आईच्या त्यागाचा, अपत्य प्रेमाचा एक प्रसंग सांगितला आहे. ट्रेनिंग कॉलेजमध्ये जाण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. तेव्हा तिने मंगळसूत्र काढून दिले आणि पैशांची व्यवस्था केली. हा प्रसंग सांगताना ते म्हणतात, हा दिवस मी कधीही विसरणार नाही. एक हा प्रसंग माझ्या आईचे धैर्य व त्याग दाखवणारा होता. जी आई आपल्या सौभाग्याकरता तीन तीन दिवस वटपौर्णिमेचा उपवास करी ती आई माझ्या शिक्षणासाठी मंगळसूत्र गहाण टाकण्यास तयार झाली. एवढेच नव्हे तर तिने सांगितले की, मी या मंगळसूत्रासहित देवाघरी जाणार आहे. या मातेचा काय तो आत्मविश्वास? काय तो त्याग? किती ज्वाजल्य अपत्य प्रेम![13] रेगे आपल्या आईच्या त्यागाचे अपत्यप्रेमाचे उदात्तीकरण करतात. हे मार्गदर्शक ठरण्याचे हेतुतून लिहिले गेलेले आत्मचरित्र असल्याने असे आईचे वागणे आदर्शभूत ठरते. सर्व स्त्रियांकडून सर्वच प्रकारच्या त्यागाची अपेक्षा केली जाते.

शिक्षणाधिकारी रा.ना. झोळ यांनी **रामप्रहर** या आत्मचरित्रात ते बी.ए. परीक्षा पास झाले इथपर्यंतचा आपला आयुष्यक्रम कथन केला आहे. त्यात त्यांनी पहिली चाळीस पाने आपली पार्श्वभूमी दिली आहे. त्यांच्या आईचे लग्न झाल्यावर तिच्या कष्टांची आणि सासूने केलेल्या छळाची हकीगत यात आली आहे. ही अर्थातच ऐकीव माहितीवर आधारित आहे आणि तृतीयपुरुषी निवेदनात आहे. पहिल्या भागात तारुण्यात विधवा झालेल्या आईने स्वतःच्या हिमतीवर आणि कष्टावर कोणाचा आधार नसताना दोन मुलांना वाढवले. त्यासाठी तिने शेतातली कामे केली. मोलाने दळणे दळली. गुरुजींच्या घरची भांडी घासली. मजुरी केली. अडीअडचणीला उपाशी राहूनही दुसऱ्याकडे स्वयंपाकाचे काम केले. आपल्या प्रकृतीची पर्वा न करता आपल्या दोन मुलांना शिकवलं. हा भाग आला आहे. प्रतिकूल परिस्थितीत श्री. झोळ बी.ए. पास झाल्यावर 'आता दादाही बी.ए. झाला. म्हणजे तुम्ही खरी मिळवली. आई बोलून गेल्या. त्यांचे ते गोड विचार पेढ्याच्या गोडीपेक्षाही कितीतरी अधिक गोड, अधिक चविष्ट व अधिक प्रेरक वाटले.'[14] अशा शब्दात ते आईच्या आशीर्वादाचा उल्लेख करतात. या आत्मचरित्राची प्रासादिक चित्रमय वर्णन शैली कादंबरीप्रमाणे मनोरंजक व उत्कंठा वाढवणाऱ्या घटनांची मालिका यामुळे हे आत्मचरित्र लक्षवेधक ठरते. त्यांनी आईचे चित्रणही याच मनोवेधक भाऊक. आदराच्या भावनेतून आत्मचरित्रात केले आहे. काही ठिकाणी आईसाठी आदरार्थी संबोधन येते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पाठीशी कोणी नसताना एखाद्या आईने असे कर्तृत्व दाखवले तर सर्व स्त्रियांनी असे असावे अशी अपेक्षा ठेवली जाते.

अशाच अपेक्षेतून पां.चि. पाटील (**माझ्या आठवणी**) आपल्या बहिणीच्या मृत्यूनंतर तिच्या चार महिन्याच्या मुलाला पाहून आपल्या आईला ६७ व्या वर्षी पान्हा फुटला असा शास्त्रीयदृष्ट्या अविश्वसनीय प्रसंग सांगतात. त्यांच्या आईने त्या मुलाला मोठे केले. यासारख्या प्रसंगामध्ये आईच्या उदात्तीकरणाची भावना आहे.

वि.द. घाटे (**दिवस असे होते**) यांनी आपल्या आईकडे एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून बघण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांचे आईबद्दलचे लेखन अगदी धूसर वाटावे असे आहे. आई लहानपणीच गेल्याने ऐकीव माहितीवर आधारित असे हे लेखन आहे. काही ठिकाणी ते काल्पनिक वाटते. आईचे काल्पनिक माहेर, काल्पनिक सासर यांचे चित्र रेखाटले आहे. इतकेच नाही तर आई आणि वडील यांचे संबंधही काल्पनिकच आहे. लेखनाची भाषाशैली पाहिल्यास हे स्पष्ट होते. उदाहरणादाखल ते म्हणतात. 'नानी तुझ्या त्या खेडेगावी तू कशी होतीस. काय करत होतीस. माझ्या डोळ्यांना सारे दिसते. तुझा मुलगा असलो तरी तुझ्या आज्यासारखा

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati



आहे आणि मी फार पाहिले आहे. फार शोधले आहे. पुष्कळ सोसले, गमावले आहे. मी जाणतो.'

'भल्या पहाटेस तू आपल्या कपिला गाईची धार काढत होतीस आणि खडीसाखरेचा खड्याबरोबर गरम धारोष्ण पीत होतीस. कपिलेची मान खाजवत होतीस. न्याहारीला तू कोवळी, दुधाळ कणसे खात होतीस. निंबोणीच्या झाडाखाली झिम्मा खेळत होतीस. गावाबाहेरच्या देवीच्या देवळाच्या आवारात लपाछपी खेळत होतीस. विहीरीकडे जात होतीस. मोट वर येत असताना तिच्या नाड्या वर हेलकावे खात होतीस. आणि खदाखदा हसत होतीस. वर आली म्हणजे ती आपल्या वासलेल्या काळया सोंडेतून थारोळ्यात चांदरस ओतीत होतीस. तुझ्या हृद्य संपुष्टात तू किती नाद साठवले होतेस. सकाळची जात्यावरची गाणी, संध्याकाळी परत येणाऱ्या गाईचा घंटानाद, वासरांचे हंबरणे, वावरातील पाखरांची किलबिल, पलीकडच्या झऱ्याची संथ आळशी झुळझुळ आणि माळावरून मोकाट सुटलेल्या पिसाट वाऱ्याचा सांद्र आणि आर्त धुत्कार!'[15]

तर सासरच्या संदर्भात ते म्हणतात, 'तू नवी नवरी. उंबरा ओलांडून घरात आलीस. माझ्या आजीने तुला पोटाशी धरले असेल. पाठीवरून हात फिरवला असेल. पदराने डोळे पुसले असतील. तुझ्या तोंडात साखर घातली असेल. खरे ना? होय ना? त्या दिवशी तुला नवी आई लाभली. काय म्हणाली ती? आजवर होती तुमची. आता झाली आमची. नानी झालीस का आमची तू?[16] आई आणि वडील यांच्या संदर्भात ते लिहितात, दत्त आणि तू दोघेही?? पोरी पोरांचा संसार –भातुकली पोरांचे प्रेम आणि पोरांचे आराधन 'तुमचा जमानाच वेगळा होता. वडील माणसांसमोर बोलणे गैर होते. तुम्ही जाता–येता खुदकन हसत असाल. डोळ्यांनी बोलत असाल.' 'कदाचित तू लपकन दत्तांच्या हातात आवळा ठेवून स्वयंपाक घरात पळाली असशील. तुला कोहळा मिळाला का? आवळा तरी मिळाला का? तुमचा तो लपंडाव होता आणि त्यात तू सराईत होतीस. पण गडे तुझा गडी तुला सापडला नाही. सापडण्याच्या बेतात आला होता. खरे ना? होय ना? पण तो सटकला. मृत्यूचा हात धरून.'[17]

वरील उताऱ्यामधील भाषाशैली, प्रश्नार्थक लेखन, स्वतः त्याचे दिलेले उत्तर यावरून त्यातील काल्पनिकता जाणवते. तसेच विसंगतीही जाणवते. आठवणीच्या सुरुवातीला ते नागपंचमीला आईने गायिलेल्या लोकगीताच्या मोकळ्या भरदार सुराचा उल्लेख करून तो घरी कधी कानी न पडल्याने आपण सुखाने, आश्चर्याने, कौतुकाने तिच्याकडे पाहिले असेल असे म्हणतात. तर घाट्यांचे घर म्हणजे माहेर असते. पहिल्या माहेरी जायला त्या तयार नसतात. आपल्या आजीने तिला पोटाशी धरून पाठीवरुन हात ठेवून पदराने डोळे पुसले असतील असेही म्हणतात.

अशाच भाषेत ते आपल्या आईला परिस्थितीची जाणीव करून देतात. त्यातून तिचे गुण–दोष सांगतात. तेजस्वी, स्वाभिमानी, आणि हटेल आईला काही अटींवरच शरण जाणे मान्य असेल. याची कल्पना त्यांना आहे. जितकी माणसे तितकी मने. तितक्या गुहा प्रत्येक मनाची गुहा वेगळी. तीही अंधारी हे ते मान्य करतात. आणि आईच्या काळातील गुहा खोल काळोख्या होत्या. याचीही त्यांना कल्पना आहे.

दत्तांच्या मृत्यूनंतर दीड–दोन वर्षांनी तिचाही मृत्यू झाला. तेव्हा ते म्हणतात, नानी आणि तुझ्यावर तुझ्या पिढीवर नियतीचा शाप होता तुम्ही साऱ्याजणी सती गेलात. मुकाट्याने ओठ दाबून पण तुमच्या मरणातून आम्हाला जीवन लाभले.'[18] अशा रीतीने आईच्या गुणदोषांची, वास्तवाची चर्चा करताना ते भावनावशतेने त्यात वाहवतात. त्यामुळे गुणदोषांची किंवा नियतीच्या शापाने सती जाण्याच्या वास्तवाची चिकित्सा ते अर्धवट सोडतात. परंपरागत आईच्या थोरवीच्या कल्पनेला ते चिकटल्याचे दिसतात. त्यांना आईच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे भान आल्याचे दिसते. पण दबलेल्या व्यक्तिमत्त्वाची, त्यामागील कारण परंपरेची मीमांसा न करता भावनेत वाहवणे ही प्रवृत्ती दिसते. साहित्यिक शैलीचा साज आणि भाषा विभ्रमाच्या माध्यमातून घाटे या कारण परंपरेची मीमांसा टाळतात.

### सावत्र आईविषयीच्या भावना

सख्ख्या आईविषयी आत्मचरित्रकारांच्या भावना लक्षात घेतल्यावर सावत्र आईकडे पाहण्याचा **लेखकांचा दृष्टिकोन कोणता आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते.** नाना कुंटे (**वाटचाल**) यांची आई त्यांच्या चौथ्या पाचव्या वर्षी वारली. तिचा सहवास त्यांना मिळाला नाही. त्यामुळे त्यांना आई कशी असते याचा अनुभव फार नाही. पण सावत्र आईने सख्खा–सावत्र असा भेद न करता सर्व भावंडांना सारखीच वागणूक दिली. असे मत नोंदवले आहे.वासुदेव विश्वनाथ बेडेकर (**बेडेकर जीवनवृत्तांत**) यांना सावत्र आईच्या पोरकेपणाची, कष्टाची जाणीव आहे. तिनेही आपल्याला सावत्रपणाची जाणीव होऊ दिली नाही. असे ते सांगतात. किरकोळ अंगकाठीची ही सावत्र आई आपुलकीने पाहुण्यांचा परामर्ष घेते. वरचेवर मुले होऊनही त्रासलेली नसून समाधानी वृत्ती चेहऱ्यावर दिसते. अशा तिच्या परंपरेला धरून असणाऱ्या गुणांची दखल त्यांनी घेतली आहे. सावत्र आईबद्दल ते काय म्हणतात ते त्यांच्या शब्दात पुढीलप्रमाणे, 'तिचे आई–वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे लहानपणापासूनच पोरकेपणाचे दुःख तिला सहन करावे लागले होते. लग्न झाल्यावर ती आमच्या आजीजवळ अतिशय प्रेमाने व आपुलकीने राहिली. त्याचप्रमाणे मी व आमची बहीण तिच्यापेक्षा वयाने मोठी असल्यामुळे ती बहिणीला आक्का व मला अण्णा असे आमच्या इतर भावंडाप्रमाणेच म्हणे. सर्व आयुष्यात सावत्रपणाची जाणीव तिने आम्हाला कधीच होऊ दिली नाही. व शहाणपणाची तिची वागणूक असे. फार वरचेवर मुले झाली तरीही ती कधी त्रासलेली दिसली नाही. तिची अंगकाठी अगदीच किरकोळ होती. आमच्या कुटुंबात ३४ वर्षे वास्तव्य केले. तिच्या चेहर्यावर नेहमी समाधानी वृत्ती दिसते. तसे तिच्या अंतकाळी केवळ एक वर्षाकरता तिला पती विरहीत जीवन कंठावे लागले. जीवन असह्य होऊन एका वर्षातच स्वर्गवासी झाली. आपल्या सावत्र मुलांबरोबर ती खेळीमेळीने वागत असे. सासूपण तिने कधीच दाखवले नाही. व ती घरात आल्यापासून आमच्या सांपत्तिक परिस्थिती थोडी थोडी सुधारणा होण्यास सुरुवात झाली.'[19] सावत्र आईला पतीविरहीत जीवन असह्य होऊन ती एका वर्षातच स्वर्गवासी झाली. असे म्हणून बेडेकर तिच्या मृत्यूचे उदात्तीकरण करतात. त्यांनी आपल्या सावत्र आईविषयीचे जे गुण सांगितले आहेत ते पाहिले असता पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीचे गुण जे मानले आहेत त्याचा प्रत्यय येतो. मातृगौरव भावना सावत्र आईविषयीच्या या निवेदनामध्ये दिसून येते. त्यामुळेच त्यांनी सूचक म्हणून तिचे आगमन आणि आपली सुधारू लागलेली सांपत्तिक स्थिती यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे.

मायदेव वा.गो. (**वेचलेले क्षण**) यांची आई तेरा वर्षांची आणि मायदेव सहा वर्षांचे होते. त्यांना सख्खी आणि सावत्र आई यातील फरक कळत नव्हता. आपल्या मुलाच्या लहानपणी सख्खी आई ज्या खस्ता खाते, लाड करते ते सर्व मायदेव यांच्या सावत्र आईने केले. असे ते सांगतात. नात्याने आई असणाऱ्या व्यक्तीचे वय तिच्यावर वयाने मोठ्या अशा मुलांचे लादले जाणारे आईपण या संदर्भात विचार करण्याजोगे आहे. संमतीवयाचा कायदा झाला तरी तेव्हा मुलीचे वय लहान असे आणि पतीचे वय तिच्यापेक्षा कितीतरी मोठी आहे हे लक्षात घेतले जात नसे. त्यामुळे तिच्या वयाची सावत्र मुले स्त्रीला असत. त्याचेही कोणाला विशेष वाटत नाही.हे वा.वि.बेडेकर, मायदेव याच्या आत्मचरित्रावरून दिसते.

**मधुकर तोरडमल यांची सावत्र आई आणि सख्खी आई एकत्र राहत होत्या. सावत्र आईला ते थोरली आई असे संबोधतात. थोरल्या आईच्या बहिणीशी त्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न केले. पण ती बाळंतपणात वारली.** त्यानंतर पुतळाबाईंशी तिसरे लग्न केले. ही तोरडमल यांची सख्खी आई. ते म्हणतात, दोघी सवतीमत्सर न करता समजूतदारपणे राहिल्या. थोरल्या आईने तोरडमल यांच्या जन्मानंतर त्याची सर्व जबाबदारी घेतली. घरावर आलेल्या आपत्तीला दोघींनी मिळून तोंड दिले. वडिलांच्या मृत्यूनंतर तिन्ही मुले अज्ञान असल्यामुळे पालक म्हणून कोणाचे नाव लावायचे असे थोरल्या आईला विचारल्यावर तिने आईचे पुतळाबाईचे नाव

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati



सांगितले. स्वतःसाठी स्वतंत्र पोटगीचा अर्ज करण्यास नकार देऊन तोरडमल म्हणजेच आपली पोटगी आहे. असे सांगितले. आपल्या दोन्ही आयांनी वडिलांच्या मृत्यूनंतरच्या काळात मानसिक वेदना भोगल्या. असे ते म्हणतात. आपल्याला शिस्त लावण्यात थोरल्या आईचा वाटा आहे हे ते कबूल करतात. थोरल्या आईबद्दलच्या त्यांच्या भावना पाहायच्या तर त्यांनी तिचा मृत्यू प्रसंगाचे वर्णन केले आहे ते लक्षात घ्यावे लागते. त्यांच्या थोरल्या आईला अर्धांगवायूचा झटका येऊन त्या अधू झाल्या होत्या. त्यातच त्यांना मधुमेहाचा विकार होता. त्यांच्या मरणाच्या भीतीने ते घटपटले होते. मृत्यूच्या कल्पनेनेही काळजाला चटका बसेल असे ते म्हणतात. एके दिवशी दुपारी डॉक्टरांनी त्यांना यापुढे औषध देणे म्हणजे त्यांचा त्रास काही त्रास वाढवणे असे असल्याने जे होईल ते आपोआप होऊ देण्याची सूचना केली. ते म्हणतात, 'वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आईला बसलेला हा दुसरा धक्का. थोरली आई तिची सवत नव्हतीच. थोरली बहीण होती. ...ड, फिलॉसॉफर आणि गाईड होती.'[20] तोरडमल ...च्या मनात सावत्र आईबद्दल नाराजी, परकेपणाची भावना किंवा केवळ कृतज्ञतेची भावना नाही. सख्ख्या आई इतकेच भावनिक संबंध सावत्र आईशी तोरडमल ...ंनी जोडल्याचे दिसतात.

आपल्या सावत्र आईवर झालेल्या अन्यायाची ...खल भावे पु.भा. यांनी घेतली आहे. ते त्याची ...चिकित्सा करतात. सावत्र आईला आवडणाऱ्या ...चनासारख्या गोष्टीवर वडिलांनी बंधने घातली होती. ... तिची चेष्टा करत. काही वेळा तिच्या माहेरावरून ...डवत. याची जाणीव भावे यांना आहे. एक व्यक्ती ...णूनही भावे सावत्र आईचा विचार करतात. त्यामुळे ...च्यातील गुणदोषांचा ते परामर्श घेतात. ते सावत्र ...ईला वडिलांप्रमाणेच अहो असे संबोधतात. भावे ...णतात, 'सावत्र आई मला ही होती. आजही माझी ...वत्र आई जिवंत आहे. तिचे माझ्याशी झालेले सगळे ...र्तन आदर्श म्हणता येणार नाही. पण ही बाई हाडाची ..., क्रूर किंवा पिसाट नव्हे. उलट तिचा मूळचा पिंड दयाळू आहे. दुसऱ्याच्या दुःखाने विरघळणारा आहे. तिच्याजवळ काही न्याय आहे. परोपकाराची बुद्धी आहे. मी पंधरा वर्षांचा असताना पांडुरणा येथे माझ्या वडिलांनी मला एकदा बांबूने व तो बांबू मोडल्यावर चामड्याच्या पट्ट्याने भयंकर झोडपून काढले. तेव्हा माझी ही आई बाळंतपणातून उठली होती. बाजेखाली निखाऱ्याने भरलेले घमेले ठेवून शेक घेत होती. वडील मला मारून थकल्यावर तिने तेच घमेले माझ्या पलंगाखाली सरकवले. ही माणुसकीची लहानशी गोष्ट माझ्या स्मरणातून कधीही गेली नाही. तिच्याविषयी आज माझ्या मनात मुळी सुद्धा राग नाही. काही बायका जातीच्याच अघोरी असतात. तशी ती नाही. हे मला चांगले ठाऊक आहे.'[21] आपल्या सावत्र आईने आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर आठवण आणि शक्ती गेलेल्या त्रासदायक नणंदेला तिच्या शेवटच्या दिवसात आसरा दिला होता. हा तिच्या चांगुलपणाचाही ऊल्लेख करतात. सावत्र आईची माणुसकी, मनाचा मोठेपणा, दयाळूपणा या गुणांचा उल्लेख करतात. तसेच तिचे कामसू नसणे, सावत्र मुलावर आपल्या नवऱ्याने जास्त खर्च करू नये असे वाटणे यासारखे दोषही सांगतात. खरे तर दोष म्हणून वरील गोष्टींचा उल्लेख न करता ती स्वाभाविक गोष्ट मानतात. सावत्र मुलावर नवऱ्याने जास्त खर्च करू नये असे सावत्र आईला वाटणे त्यांना स्वाभाविक वाटते.

थोडक्यात, सख्ख्या आईप्रमाणे सावत्र आईचा जरी आत्मचरित्रकारांनी मोठेपणा वर्णन केला नसला तरी सावत्र आईविषयी आत्मचरित्रकार नाराजीचा सूर काढत नाहीत. तर समाधानाचे उद्गार काढतात. सावत्र का होईना ती आपली आई आहे. ही पूज्य उदात्त भावना यामागे दिसते.

**सारांश**

* आत्मचरित्रकारांनी आपल्या आईची कोणत्या ना कोणत्या रूपात दखल घेतली आहे.
* आईची थोरवी वर्णन करुन एखाद्या गुणाचे, घटनेचे, उदात्तीकरण करण्याची प्रवृत्ती दिसते. तिने

लावलेल्या शिस्तीच्या संदर्भातही अशीच प्रवृत्ती दिसते.

* आत्मचरित्रकार आईच्या बाह्यरूपाचा उल्लेख करतात. तरी ते फारसे विचारात घेत नाहीत.
* पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीचे म्हणून जे रूप मानले आहे त्याला फारसे महत्त्व न देता आईचे जसे बाह्यरूप असेल तसे रेखाटतात.
* आईचे वास्तव रूप ते स्वीकारतात.
* आईच्या रूपापेक्षा तिच्या चांगल्या स्वभावाची, गुणांची दखल घेतात. हे गुण पुरुषप्रधान संस्कृतीने आई या संकल्पनेवर लादलेले गुण आहेत, हेही लक्षात येते.
* आई वडील यांच्या स्वभावातील रुपातील तफावत आणि त्यामुळे आईवर होणारा अन्याय याची दखल आनंद साधले आणि श्रीपाद जोशी यांनी घेतली आहे. त्याचबरोबर वाचन-लेखन, समाजसेवा काळाबरोबर बदलून त्यानुसार वर्तन करणाऱ्या आईची लक्षणीय रूपे ही अपवादात्मकरित्या दिसतात.
* आईकडे एक व्यक्ती म्हणून न पाहता आई संकल्पनेचा आदर्श समोर ठेवल्याने त्यातील एखादा गुण तिच्यात नसेल तर आत्मचरित्र लेखक आपली नाराजी व्यक्त करतात. पण त्याचबरोबर त्यामागील कारण शोधण्याचा आपल्यापरीने प्रयत्न करतात. त्यामुळे तिच्या मृत्यूनंतर ती नाराजी निघून जाते.
* या आत्मचरित्रांवरून तिच्या परंपरेने मानलेल्या गुणांचे उदात्तीकरण केले आहे. असे दिसते. तिचा विचार व्यक्ती म्हणून न करता आई म्हणून त्यागी, कष्टाळू, प्रेमळ, सोशीक इत्यादी गुणांनी युक्त असाच असा केला जातो.
* महत्त्वाचे निर्णय घेताना तिचा, तिच्या मताचा विचार केला जात नाही. अपवाद म्हणून किर्लोस्कर आईच्या मृत्यूशय्येवर तिच्या मताप्रमाणे कारखान्यात लक्ष घालण्याचे वचन देऊन ते पाळतात.
* स्त्रीवादी संकल्पनेनुसार प्रत्येक स्त्रीमध्ये मातृत्वास आवश्यक असे गुण असतातच असे नाही. जैविकदृष्ट्या अशी स्त्री आई बनली तरी तिच्यावर मातृत्व लादणे हा तिच्यावर अन्यायच आहे. अशा मातांचे चित्रही काही आत्मचरित्रांमधून दिसते. उदाहरणार्थ श्रीपाद जोशी, वि.स. खांडेकर.
* आईकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तनाची चाहूल होत असल्याचे जाणवते. श्रीपाद जोशी यांना स्त्रीच्या परात्मतेची जाणीव आहे. तर पटवर्धन आपल्या आईची एक व्यक्ती म्हणून असणारी मर्यादा मान्य करतात.
* आत्मचरित्रकाराच्या नकळत्या वयात आईचा मृत्यू झाला असेल तर त्यांना एक प्रकारची हुरहूर वाटते. तिच्या सहवासानंतर मृत्यू झालेला असल्यास तिच्याबद्दलच्या उदात्त भावना त्यांच्या मनात दाटून येतात.
* कुटुंबांतर्गत होणाऱ्या आईवरील अन्यायाची नोंद आत्मचरित्रकार घेतात. पण पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमुळे हे अन्याय होतात याची त्यांना जाणीव झालेली दिसत नाही. त्या अन्यायाची कारणमीमांसा ते करत नाही.
* अनेक वेळा साहित्यिक शैलीचा साज आणि भाषा विभ्रमाच्या माध्यमातून कारण परंपरेची मीमांसा टाळली जाते.
* काही वेळा ते स्वतःच लहान असल्याने, परावलंबी असल्याने त्याविरुद्ध काही उपाययोजना करू शकत नाहीत.
* काही वेळा शक्य असूनही अन्यायाच्या संदर्भात प्रत्यक्ष कृती ते करत नाहीत.
* अनेक कला असणाऱ्या आईकडूनही घरातील कामाची मुलांकडे लक्ष देण्याची अपेक्षा ठेवून ती सुपर वुमन असावी, असे त्यांना वाटते.

**संदर्भ**

1) का.न. केळकर, वाळवंटातील पाउले, प्रकाशन ग.ल. ठोकळ 1963. पृ. 215.
2) श्री.के. क्षीरसागर, तसबीर आणि तकदीर, पॉप्युलर

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

प्रकाशन, 1976 पृ. 25.
3) शि.द. रेगे, माझे जीवन माझी बाळं, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती, 1983. पृ. 9.
4) वि.स. खांडेकर, एका पानाची कहाणी, देशमुख आणि कं. 1981, पृ. 41.
5) श्रीपाद जोशी, उलगाउलग, कॉन्टिनेन्टल, 1983 पृ. 47.
6) तत्रैव पृ.44.
7) ना.म. पटवर्धन, विरंगुळा, व्हीनस प्रकाशन, 1960, पृ.11.
8) पु.भा. भावे, प्रथमपुरुषी एकवचनी, खंड 1, विश्वमोहिनी, पृ.105.
9) व.शं. देसाई, अशीच एकाची गोष्ट, सोमैय्या प्रकाशन, 1971, पृ.28.
10) मधुकर तोरडमल, तिसरी घंटा, मॅजेस्टिक प्रकाशन 1985, पृ.12.
11) तत्रैव पृ.108.
12) तत्रैव पृ.107.
13) शि.द. रेगे, उनी, पृ.57.
14) रा.ना. झोळ, रामप्रहर, उत्कर्ष प्रकाशन, 1985, पृ.237.
15) वि.द. घाटे, दिवस असे होते, मौज, 1961, पृ.37-38.
16) तत्रैव पृ.38.
17) तत्रैव पृ. 39.
18) तत्रैव पृ. 39.
19) वा.वि. बेडेकर, बेडेकर जीवनवृत्तांत, शामला प्रकाशन, 1961.
20) मधुकर तोरडमल, उनी, पृ. 107.
21) पु.भा. भावे. उनी. पृ. 137.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

## लेखनाबाबत आवाहन

'वसंतवर्षा' त्रैमासिकामध्ये दर्जेदार, वैचारिक लेखनाचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. पण 'वसंतवर्षा'कडे आपले लेखन पाठविण्यापूर्वी काही काळजी घ्यावी, अशी विनंती आहे.

१. आपले लेखन सुवाच्च्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस असावे. लेख संगणकावर टंकलिखित केलेला असेल, तर वर्ड, पीडीएफ अशा दोन्ही स्वरूपात पाठवावा. त्या सोबत आपला संक्षिप्त परिचय द्यावा. त्यामध्ये आपला पत्ता, ई-मेल आणि भ्रमणध्वनी क्रमांक द्यावा.

२. आपण लेखनासाठी जे संदर्भ वापरले असतील, ते लेखाच्या शेवटी द्यावे. काही टीपा असल्यास त्यांचाही उल्लेख लेखाच्या शेवटी स्वतंत्रपणे करावा.

३. आपण आपला लेख यापूर्वी कुठल्याही नियतकालिकात प्रसिद्धीसाठी पाठविला नाही, याची स्पष्ट कल्पना 'वसंतवर्षा'च्या संपादकांना द्यावी.

४. 'वसंतवर्षा' मध्ये लेख छापण्यापूर्वी तो संपादक मंडळातील सदस्याच्या अभिप्राया नंतर 'वसंतवर्षा'च्या कोणत्या अंकात येईल हे यथावकाश कळविले जाईल, याची लेखकाने कृपया नोंद घ्यावी.

आपल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ आपले आभारी आहे.

**संपादक मंडळ**